**[वेळ : ३.०० तास ]** **[गुण : १०० ]**

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**
**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.**
**३. प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.**

**प्र. १ अ.** आधुनिक या संकल्पनेचा आढावा घेऊन आधुनिकता आणि धर्मसुधारणा चळवळ हा परस्परसंबंध उलगडून सांगा. २०

**किंवा**

**ब.** आधुनिकतावादी साहित्याच्या स्वरूपविशेषांची विस्ताराने चर्चा करा.

**प्र. २ अ.** आधुनिक मराठी कथेच्या वाटचालीत 'यशवंत' आणि 'किर्लोस्कर' या नियतकालिकांनी दिलेल्या योगदानाचा परिचय करून द्या. २०

**किंवा**

**ब.** आधुनिकपूर्व मराठी कादंबरीचे स्वरूप कसे होते ते साधार नमूद करा.

**प्र.३ अ.** सतीश तांबे यांच्या 'मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट 'या कथासंग्रहातील आधुनिकतावादी आशयसुत्रांचा आढावा घ्या. २०

**किंवा**

**ब.** 'मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट' या कथासंग्रहातील कथेचा रूपबंध आधुनिक आशयमूल्यांना कसा साकारतो याची चर्चा करा.

**प्र. ४ अ.** 'पुरोगामी' या राकेश वानखेडे यांच्या कादंबरीचे कथानक तुमच्या शब्दात सांगा. २०

**किंवा**

**ब.** 'पुरोगामी' कादंबरीच्या केंद्रस्थानी असलेल्या बिबळवाडा प्रकरणाचे विवेचन करा.

**प्र.५** पुढीलपैकी कोणत्याही **दोन टिपा** लिहा. २०

**अ.** प्रबोधन चळवळ आणि आधुनिकता सहसंबंध

**ब.** १९६० ते १९९० या कालखंडातील मराठी कादंबरी

**क.** 'मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट' या संग्रहातील कथांची वैशिष्ट्ये

**ड.** 'पुरोगामी' कादंबरीची आशयसूत्रे

***************